ePaper

“काहीही झालं तरी राष्ट्रवादीचा पालकमंत्री होऊ देणार नाही: आ संजय गायकवाड



| वर्ष - 7 | अंक -75 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www .mahaenews.com | रविवार, दिनांक 16 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- फडणवीसांचे 'पंचामृत' दादांच्या हाती !
- वेस्ट इंडिजचा सुपडा साफ!
- पुणे मेट्रोचा दुसरा टप्पा लांबणीवर?
- मीना कुमारीचा बायोपिक


# अजित पवार गटाला ‘धक्का’!

## » शहरातील युवक ‘साहेबांसोबत’ : इम्रान शेख यांनी जाहीर केली भूमिका

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष इम्रान शेख यांनी आपल्या युवक पदाधिकाऱ्यांसोबत आज मुंबई वाय बी सेंटर येथे शरद पवार साहेबांची भेट घेतली.धार्मिक,तेढ,जातीवाद,द्वेष पसरवून देशाच्या एकतेला धोका निर्माण करणाऱ्या समाज कंटकांना रोखण्यासाठी राष्ट्रवादी युवकची पूर्ण कार्यकारणी शरद पवार साहेब यांच्या पाठीशी असल्याचे त्यांनी सांगितले**





विशेष म्हणजे, शहरातील युवक राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष इम्रान शेख शरद पवार गटात सहभागी होतील, असे वृत्त ‘महाईन्यूज’ ने दिले होते. “विचारांशी तडजोड नाही..” या मथळ्याखाली दिलेले ते तंतोतंत खरे ठरले आहे.

दरम्यान, शहर राष्ट्रवादीत आंदोलनात्मक भूमिका घेत पक्षाचा आक्रमपणा टिकवून ठेवण्यासाठी अल्पसंख्याक आणि बहुजन समाजातील युवकांची मोट बांधणारा क्रीयाशील युवक शहराध्यक्ष शरद पवार गटात दाखल झाल्यामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला धक्का मानला जात आहे.

यावेळी मौलाना अब्दुल गफार,ओम शिरसागर, शाहिद शेख, मयूर खरात, रुबान शेख, अजय शिंदे, सूरजपटेल, विकास कांबळे,इरफान शेख, फहीम शेख, मुवाज मुजावर युवक पदाधिकारी उपस्थित होते

इम्रान शेख म्हणाले की, "पक्षाकडून मला पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी युवक काँग्रेस अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली गेली. धर्मनिरपेक्ष विचारांचा आणि पुरोगामी विचारांचा वारसा पुढे घेऊन जाण्यासाठी सर्व जाती धर्मातील,समाज घटकातील युवकांना बरोबर घेऊन त्यांना संघटित करून पक्ष संघटना बळकट करण्याचे काम मी युवक अध्यक्ष म्हणून केले. पक्षाने दिलेली जबाबदारी विश्वास व संधी यास पुरेपूर न्याय देण्याचा मी प्रयत्न केला आहे. तथापि बदलत्या राजकीय परिस्थितीमध्ये जातीयवादी व धर्मांध शक्तीं असलेल्या भाजपला बळकटी मिळू नये म्हणून मी माझ्याबरोबरच्या युवक कार्यकर्त्यांच्या, पिंपरी चिंचवड शहरातील अल्पसंख्याक समाजाच्या भावनांचा व त्यांनी केलेल्या अग्रहाचा मान राखून आदरणीय लोकनेते पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या लोकशाही पूरक व शिव फुले शाहू आंबेडकर या विचारांशी बांधिल राहण्याचा निर्णय घेत आहे.

आज सबंध देशामध्ये आणि प्रामुख्याने महाराष्ट्रातील अल्पसंख्याक समाजाला भाजपाकडून लक्ष केले जात असताना. भाजप सारख्या प्रतिगामी विचारांना थोपवण्याची ताकद शरद पवार साहेब यांच्यामध्येच असून शरद पवार साहेब बहुजन समाज अल्पसंख्याक समाज यांची शेवटची आशा आहेत.


ePaper ज्येष्ठ अभिनेते रवींद्र महाजनी यांचं पुण्यातील घरी निधन

महाईन्यूज

आतील पानांत

विचारधारेशी तडजोड नाही!

» शहरातील ‘युवकांची’ भूमिका : इम्रान शेख यांची वाटचाल ‘साहेबांसोबत’च?

ग्राउंड रिपोर्ट

**“ उपमुख्यमंत्री अजित दादा पवार हे सदैव दैवस्थानी व सर्वोच्च आदरस्थानी असतील. अजितदादांच्या कार्यकर्तृत्वाविषयी माझ्या मनात नितांत आदर आहे. दादांनी मला जी संधी दिली त्यांच्यासाठी मी दादांचा सदैव ऋणी असेल. शहराध्यक्ष अजित गव्हाणे, माजी महापौर योगेशभाई बहल, नाना काटे आणि इतर सदस्य यांचा देखील मी आभारी आहे. यापुढे शहरातील प्रमुख समस्यावर आवाज उठवण्याचा काम राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या माध्यमातून केले जाईल.**

**– इम्रान शेखर,**
शहराध्यक्ष, युवक राष्ट्रवादी (शरद पवार गट)...

# मेट्रोचा दुसरा टप्पा लांबणीवर?

## 33 किलोमीटरच्या मेट्रोचे काम सात वर्षांनंतरही अपूर्णच

### नव्या मेट्रो मार्गांसाठी आणखी किती काळ प्रतीक्षा करायची

।पुणे/ जेजुरी ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**शहरातील पहिल्या टप्प्यातील ३३ किलोमीटरच्या मेट्रोचे काम सात वर्षांनंतरही अपूर्णच असताना, दुसऱ्या टप्प्यातील मेट्रो मार्गांचाही घोळ सरकारी यंत्रणांना निस्तरता येत नसल्याचे चित्र आहे. शिवाजीनगर (सिव्हिल कोर्ट) ते लोणी काळभोर (हडपसरमार्गे) आणि खडकवासला ते खराडी (हडपसरमार्गे) या दोन मार्गिका कोणी विकसित करायच्या यासाठी नव्याने 'सल्लागार' नेमण्यात येणार आहे.**



या मार्गाची उभारणी सरकारी खर्चाने (ईपीसी) की सार्वजनिक-खासगी भागीदारी स्वरूपात (पीपीपी) करणे व्यवहार्य ठरेल, याचा अहवाल मिळाल्यानंतर या मार्गांच्या मान्यतेची पुढील प्रक्रिया सुरू होईल.

महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने (महामेट्रो) खडकवासला ते खराडी या २५ किलोमीटर मार्गिकेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) शिवाजीनगर ते लोणी काळभोर या २९ किलोमीटरच्या मार्गिकेचा अहवाल तयार केला आहे. यावर सहा ते आठ महिन्यांपासून खल सुरू आहे. या दोन्ही मार्गिकांबाबत व्यवहार्य निर्णय घेण्याच्या सूचना यापूर्वीच 'पुणे एकीकृत महानगर परिवहन प्राधिकरणा'चे (पुमटा) अध्यक्ष विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी दिल्या होत्या. मात्र, अद्यापही त्याबाबत निर्णय झालेला नाही. शुक्रवारच्या 'पुमटा'च्या बैठकीत या दोन्ही मार्गांसाठी येणारा खर्च आणि त्याची व्यवहार्यता यांचा आढावा घेण्यासाठी सल्लागार नेमण्याचे ठरविण्यात आले. सल्लागाराची नियुक्ती आणि त्याचा अहवाल प्राप्त होण्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता ही प्रक्रिया किमान पुढील चार ते सहा महिने सुरू राहण्याची शक्यता आहे.

त्यामुळे पुणेकरांनी नव्या मेट्रो मार्गांसाठी आणखी किती काळ प्रतीक्षा करायची, असा प्रश्न विचारला जात आहे.

### सर्वंकष वाहतूक आराखड्यात सुधारणा

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) तयार केलेल्या सर्वंकष वाहतूक आराखड्यात (सीएमपी) सुधारणा करण्याचा निर्णय शुक्रवारच्या 'पुमटा'च्या बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच, सिव्हिल कोर्ट येथे दोन्ही हिंजवडी मेट्रो आणि महामेट्रोची स्टेशन जोडण्यासाठी या बैठकीत मान्यता देण्यात आली. हिंजवडी-शिवाजीनगर मेट्रो मार्गिकेचे म्हाळुंगे-बालेवाडी येथील श्री शिवछत्रपती स्टेडियमसोरील काम सध्या वेगाने पुढे सरकत आहे. मुंबई-बेंगळुरू महामार्गाला समांतर मार्गिकेचे (व्हायडक्ट) बहुतांश काम या ठिकाणी पूर्ण झाले आहे.

# हिंजवडीत बर्निंग कारचा थरार

## क्षणार्धात मोटार जळून खाक खाली

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मुंबई-बंगळुरू महामार्गावरील मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर पुनावळे येथे शनिवारी (ता. १५) सकाळी नऊच्या सुमारास नागरिकांनी बर्निंग कारचा थरार अनुभवला. चालत्या व्हीआयपी मोटारीने अचानक पेट घेतला. क्षणार्धात मोटार जळून खाक खाली.**



सुदैवाने मोटारीतील तीघां प्रवाशांना कुठलीही इजा झाली नाही. मात्र, महामार्गावर तासभरवाहतूककोंडीचा सामना सर्वांना करावा लागला. याबाबत माहिती अशी, मर्सिडीज एमएच १२, एसक्यू १५५२ या क्रमांकाची मुंबईच्या दिशेने चाललेली मोटार पुनावळे येथील साई मिलेनिअम जवळ पोहचली असता या मोटारीच्या सायलेन्सरमधून आग निघत असल्याची बाब मागील मोटार चालकाच्या लक्षात आली त्याने समयसुचकता दाखवत मोटार चालकाच्या निदर्शनास ही बाब आणून दिली.

### सुदैवाने मोठी दुर्घटना टळली

चालकानेही प्रसंगावधान राखत मोटार बाजूला घेत सर्वांना खाली उतरवल्याने मोठी दुर्घटना टळली. मोटारीतील सर्वजण खाली उतरताच मोटारीने मोठा पेट घेतला. बघता-बघता मोटार जळून खाक झाली. पोलिसांनी पाचारण केलेल्या अग्निशामक दलाच्या जवानांनी आग विझवली. वाकड वाहतूक विभागाने क्रेनच्या सहाय्याने मोटार रस्त्याच्या बाजूला करून घेत महामार्गावरील वाहतूक पूर्ववत केली. या आगीचे नेमके कारण मात्र समजू शकले नाही. आगीने धुराचे मोठाले लोळ परिसरात पसरले होते तर बघ्यांच्याही मोठी गर्दी झाली होती.

# लाच घेणारा फौजदार रंगेहाथ सापडला

।पुणे। महाईन्यूज ।

पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यात साक्षीदाराला आरोपी न करण्यासाठी आणि पूर्वी बाकी राहिलेली रक्कम असे एकूण एक लाख रुपये लाच स्वीकारताना जन्सी पोलीस ठाण्यातील पोलीस उपनिरीक्षकाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई शुक्रवारी (दि.14) केली आहे. अशफाक मुस्ताक शेख (वय 37) असे एसीबीच्या पथकाने अटक केलेल्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे.

याबाबत 39 वर्षांच्या व्यक्तीने औरंगाबाद एसीबीकडे तक्रार केली आहे. जीन्सी पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात साक्षीदार याला आरोपी न करण्यासाठी शेख याने तक्रारदार यांच्याकडे 50 हजार रुपयांची लाच मागितली. तडजोडी अंती 30 हजार रुपये देण्याचे ठरले. दरम्यान तक्रारदार यांनी औरंगाबाद एसीबीकडे तक्रार केली. पथकाने पडताळणी केली असता शेख याने तक्रारदार यांच्याकडे 19 मे आणि 12 जुलै रोजी लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

तडजोडी अंती ठरलेली 30 हजार रुपयांची रक्कम देण्यासाठी तक्रारदार शेख याच्याकडे गेले. त्यावेळी या गुन्ह्यातील पूर्वी अटक केलेल्या आरोपीकडे 3 लाख रुपयांमधील बाकी राहिलेले एक लाख दहा हजार रुपयांची परस्पर लाचेची मागणी केली.

यामध्ये तडजोड करुन 70 हजार रुपये असे दोन्ही मिळून एक लाख रुपये लाचेची रक्कम स्वीकारताना अशफाक शेख याला रंगेहाथ पकडण्यात आले.

# समाजाचा विकास कौशल्य प्रशिक्षणामुळेच!

## » उपायुक्त अजय चारठाणकर : 'यशस्वी' संस्थेचा कार्यक्रम उत्साहात

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**समाजाचा खरा शाश्वत विकास हा कौशल्य विकासातूनच होऊ शकतो असे प्रतिपादन पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाचे उपायुक्त अजय चारठाणकर यांनी व्यक्त केले. जागतिक युवा कौशल्य दिनानिमित्त 'यशस्वी'संस्थेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.**



यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की संपूर्ण जगात सर्वाधिक तरुण लोकसंख्येचा देश अशी आपल्या भारत देशाची आज ओळख बनली आहे जागतिकीकरणाच्या स्पर्धेच्या तीव्र युगात नोकऱ्यांचे प्रमाण कमी होत असताना युवा पिढीने करिअर साठी उद्योजकतेचा मार्ग निवडणे गरजेचे आहे उद्योजक म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी युवा पिढीने विविध प्रकारचे कौशल्य विकास प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगाराचा मार्ग निवडायला हवा असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'यशस्वी' संस्थेच्या संचालिका स्मिता धुमाळ यांनी केले. सीमा लांबखडे या विद्यार्थिनीने सरस्वती स्तोत्र गायनाने कार्यक्रमाची सुरूवात केली. तर आभार प्रदर्शन 'यशस्वी' संस्थेच्या संतमाई स्किल डेव्हलपमेंट सेंटरच्या केंद्र प्रमुख प्राची राऊत यांनी केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाचे मुख्य समाज विकास अधिकारी रामदास चव्हाण उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमाला संस्थेचे सर्व प्रशिक्षक वर्ग व विद्यार्थी- विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### विद्यार्थी-विद्यार्थिनींचा प्रातिनिधिक सत्कार...

» अजय चारठाणकर व रामदास चव्हाण यांच्या हस्ते यावेळी तृणधान्य (मिलेट्स) रेसिपी बुक चे प्रकाशन करण्यात आले. यशस्वी संस्थेच्या हॉस्पिटॅलिटी ट्रेनिंग सेंटरच्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या तृणधान्यांच्या पंधरा पाककृतींचा या पुस्तकात समावेश करण्यात आलेला आहे.या पाककृतींचे प्रदर्शनही यावेळी भरवण्यात आले होते. तसेच यावेळी 'यशस्वी' संस्थेच्या संतमाई स्किल डेव्हलपमेंट सेंटर मधून विविह प्रकारचे कौशल्य विकास प्रशिक्षण पूर्ण करून स्वयंरोजगार सुरु केलेल्या व नोकरीची संधी प्राप्त केलेल्या काही विद्यार्थी= विद्यार्थिनींचा प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करणात आला.

“ कौशल्य विकास प्रशिक्षण पूर्ण करून स्वयंरोजगार सुरु करणाऱ्या विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन. कारण नोकरी करणारे होण्यापेक्षा नोकरी देणारे बनणे हे निश्चितच अभिमानास्पद आहे. कौशल्य प्रशिक्षण पूर्ण करून ज्यांना स्वयंरोजगार सुरु करण्याची इच्छा आहे असा युवक- युवतींनी पुणे महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या वित्तीय सहकार्य करणाऱ्या योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ घ्यावा.

**- अजय चारठाणकर,**
**उपायुक्त, समाज विकास विभाग.**

---

# शिष्यवृती परीक्षेत पिंपरी-चिंचवडकरांची 'आघाडी'

## » तब्बल 197 विद्यार्थी गुणवत्ता यादीत : परीक्षेत 1338 विद्यार्थी पात्र

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत १२ फेब्रुवारी २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल लागला असून, एकूण १९७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत.**




महापालिकेच्या शाळेतील पाचवीचा निकाल ३१.२५ टक्के तर आठवीचा निकाल २९. ४ टक्के लागला आहे. यावेळी मनपा व खासगी शाळेतील पाचवीतील १०० विद्यार्थी तर आठवीतील ९७ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले असून, शिष्यवृत्तीधारक ठरले आहेत. यावर्षी महापालिका शाळेतील पाचवीचे ७२१३ पैकी ६८८० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी २१५० विद्यार्थी पात्र ठरले. तसेच आठवीच्या ४७८५ पैकी ४६०७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी १३३८ विद्यार्थी पात्र ठरले.

महापालिकेच्या वाकड शाळेतील तीन, मोशी मुले प्राथमिक शाळा, रावेत प्राथमिक शाळा, विद्यानिकेतन प्राथमिक शाळा, पिंपरीगाव, पिंपळे गुरव प्राथमिक शाळा, कुदळवाडी प्राथमिक शाळा, जाधववाडी मुले प्राथमिक शाळा, जाधववाडी कन्या शाळा प्रत्येकी एक विद्यार्थी, असे एकूण १० विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहेत.

गुणवत्ता यादीतील पाचवीचे विद्यार्थी युवराज राठोड (८२ टक्के), वाजित शेख (८१.३३ टक्के), क्षितिज कामने (८०.६६ टक्के), शोएब शेख (७९.३३ टक्के), आराध्या चव्हाण (७४.६६ टक्के), त्रिशा शिरसाठ (७४ टक्के), परीक्षा ठाकूर (७२.६६ टक्के), दत्तप्रसाद वाळेकर (७२.६६ टक्के).

गुणवत्ता यादीतील आठवीचे विद्यार्थी धीरेंद्रकुमार महातो (जाधववाडी मुले प्राथमिक शाळा, ६८ टक्के) प्रगती मथुरदास बडगे (जाधववाडी कन्या प्राथमिक शाळा, ६७.३३टक्के).

---

# धुमस्टाईलने मोबाईल स्नॅचिंग : आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

। पिंपरी। महाईन्यूज ।

मोबाईल फोनवर बोलत पायी चालत जाणा-या नागरिकांचे महागडे मोबाईल, दुचाकीवरून धुम स्टाईलने येवून, हिसकावुन क्षणार्धात पळुन जाणा-या गुन्हेगारांना जेरबंद करण्यात पोलिसांना यश आले आहे. संभाजीनगर परिसरात सापळा रचून गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने ही कारवाई केली आहे. पिंपरी चिंचवड शहरात काही दिवसांपासून मोबाईल स्नॅचिंगच्या घटना वाढल्या होत्या. या गुन्हेगारी कारवायांना आळा घालणे व गुन्हेगारांचा छडा लावण्यासाठी गुन्हे शाखा युनिट २ ने तपासाची चक्रे फिरवली होती. गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस अंमलदार यांनी मोबाईल स्नॅचिंग गुन्हे घडणा-या भागातील सीसीटीव्ही कॅमे-यांची सातत्याने तपासणी करून कसोशिने आरोपींचा शोध घेतला. मोबाईल स्नॅचिंगचे गुन्हे करणारे गुन्हेगार हे निर्जनस्थळावरून मोबाईल फोनवर बोलत पायी चालत जातांना नागरिकांच्या पाठीमागुन मोटर सायकलवरुन येवून अचानक मोबाईल हिसकावून धूम स्टाईलने क्षणार्धात गायब होत होते. त्यामुळे त्यांच्या मोटर सायकलचा नंबर व वर्णन मिळुन येत नव्हते. गुन्हे घडणा-या भागात सातत्याने पेट्रोलिंग करुन गोपनिय बातमीदारांना सतर्क करण्यात आले होते. गुन्हे शाखा युनिट २ चे पथक संभाजीनगर भागात तात्काळ रवाना करुन संशयित आरोपींचा शोध घेतला व रोटरी क्लब चौक संभाजीनगर या ठीकाणी सापळा लावून मोटार सायकलवरून फिरणा-या तीन संशयित इसमांना शिताफीने ताब्यात घेतले. १) राज उर्फ नन्या आनंद लष्करे वय १९ वर्षे रा. गोधंळे गल्ली, दत्तनगर रामनगर पिपरी २) केशव उर्फ ओम किशोर आलंकार वय १८ वर्षे रा. सचिन टेलर्स जवळ दत्तनगर पिंपरी – पुणे व त्यांचा एक अल्पवयीन साथीदार अशी आहेत. आरोपींकडे सखोल तपास केला असता त्यांनी चिखली, दीघी व पिंपरी चिंचवड परिसरामध्ये मोटर सायकलवरून फिरून नागरिकांचे मोबाईल जबरदस्तीने हिसकावून चोरी केल्याची कबुली दिली. आरोपींकडून एकूण ६ अॅन्डाईड मोबाईल व गुन्ह्यात वापरलेली मोटर सायकल असा एकूण १,३८,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.




# 'शत प्रतिशत फोडाफोडी'!



**भाजपनं सत्तेसाठी वापरलेला फोडाफोडीचा फॉर्म्युला अनेक अर्थानं दूरगामी ठरणार आहे. ज्या शिवसेनला सोबत घेऊन भाजप राज्यात मोठी झाली, त्याच शिवसेनेला खिंडार पाडून भाजपनं 'मी पुन्हा येईन'चा हट्ट पूर्ण केला. पण तेवढं करूनही 'शत प्रतिशत भाजप'च स्वप्न पूर्ण होईल, असा विश्वास त्यांना नाही. म्हणून त्यांनी पवारांच्या राष्ट्रवादीतही फूट पाडली. ही फोडाफोडी महाराष्ट्राच्या राजकारणाचा पोत बदलणारी ठरणार आहे.**

खातेवाटप जाहीर झालं असून, अजित पवार अर्थमंत्री झाले आहेत. यातून अजित पवार यांचं बंड कशासाठी होतं, ते आता स्पष्ट होऊ लागलं आहे. अजित पवारांच्या बंडाचे तीन स्पष्ट अर्थ आहेत. एक- शरद पवार नावाचे जे गारूड महाराष्ट्राच्या राजकारणावर गेली पन्नास साठ वर्षे टिकून आहे ते त्यांचेच डाव टाकून उतरवले. उस्तादाचे डाव वापरून उस्तादालाच भर आखाड्यात अस्मान दाखवले.

दोन- विश्वगुरू होण्यास निघालेल्या महाशक्तीची, भारतीय जनता पक्षाची कमजोरी जगजाहीर झाली. 'शत प्रतिशत भाजप' या स्वप्नाला तिलांजली देत शत प्रतिशत फोडाफोडी हा नवा मंत्र महाशक्तीने निवडला.

आणि तीन - इतकी बंडाळी माजली की, महाराष्ट्रावर यापुढे कुठल्या विचारांचे राजकीय पक्ष नव्हे तर या ना त्या पक्षातून फुटून निर्माण झालेल्या राजकीय टोळ्या राज्य करतील. जग भारताकडे आशेने बघत आहे. भारत हाच आपला भाग्यविधाता असे अमेरिकेसह सर्वच आजी-माजी महासत्तांना आणि छोट्या देशांनाही वाटते. भारत हा विश्वगुरुपदी पोहोचला असून प्रत्येक देश गंडा बांधून घेत या विश्वगुरूचे शिष्यत्व पत्करू पाहात आहे. भारताची अर्थव्यवस्था लवकरच पहिल्या तीन अर्थव्यवस्थांच्या रांगेत मानाच्या पानावर बसेल, असं भाजपची महाशक्ती सातत्यानं सांगत आहे. गेल्या नऊ वर्षात ही उत्तुंग कामगिरी करणाऱ्या या महाशक्तीच्या हाती सत्ता सोपवण्यास महाराष्ट्र मात्र तयार नाही. त्यात महाविकास आघाडीचा प्रयोग इतका प्रभावी ठरला की या आघाडीचे सरकार पाडून देखील २०२४ च्या निवडणुकीत आघाडीचेच पारडे जड दिसू लागले.

केंद्रात पुन्हा मजबुतीने सत्ता राखायची असेल तर उत्तर प्रदेश नंतर सर्वाधिक ४८ खासदार निवडून देणारा महाराष्ट्र सोबत लागेल. तो एक हाती जिंकण्याची ताकद भाजपकडे नाही. आधी शिवसेना आणि आता राष्ट्रवादी काँग्रेस फोडून भाजपने ही कबुली दिली. अजित पवार उपमुख्यमंत्री झाल्यावर भाजपचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस केंद्रात जाऊ शकतात अशी चर्चा सुरु झाली. तसे झाले तर महाराष्ट्रात सत्ता भाजपची, मुख्यमंत्री शिंदेसेनेचा आणि उपमुख्यमंत्री फुटीर राष्ट्रवादी काँग्रेसचा, असे विचित्र चित्र निर्माण होईल. आताही सरकारात सर्वात मोठा पक्ष तिसऱ्या क्रमांकावर आणि आपापले पक्ष फोडून बाहेर पडलेल्या दोन राजकीय टोळ्या पहिल्या-दुसऱ्या क्रमांकावर.

भाजपनं हा सत्तेचा अवमान गोड मानून घेतला कारण महाराष्ट्र जिंकणं सोपं नाही आणि महाराष्ट्र जिंकला तर देश जिंकला! या राजकीय सक्तीपुढे महाशक्तीने माघार घेतली.

शत प्रतिशत भाजपचे स्वप्न बाजूला ठेवले. निवडणुकांच्याच मैदानातून होणाऱ्या पक्षविस्ताराला आलेल्या मर्यादा स्वीकारल्या. लोकसभा आणि विधानसभेच्याही जागा वाटपात आता तीन चार वाटे करावे लागतील. भाजपचे म्हणून सहा सात मित्र पक्ष आहेत. ते त्यांच्या जागा मागतील. शिंदे सेना आणि फुटीर राष्ट्रवादी आधीच आपले संख्याबळ बाळगून आहेत. पण ते तेव्हढ्याच जागा लढवतील असे नाही. सत्तेतले तीन पक्ष विरूद्ध विरोधातील तीन पक्ष असा घनघोर संघर्ष आता महाराष्ट्राच्या कुरुक्षेत्रात लढवला जाईल. अजित पवार यांच्या बंडाने अनेक लक्ष्मण रेषा भाजपसाठीच ओढल्या गेल्या आहेत.

## संपादकीय »

# ...तरीही कुंदेरा!

***कथानक आणि पात्रे रंगवण्याचे तंत्र आणि तत्त्वचिंतनाची सखोलता मिलान कुंदेरा यांच्याकडे असूनही त्यांनी वाचकांना काहीही आयते दिले नाही..***

'द जोक' ही मिलान कुंदेराची पहिली कादंबरी चेक भाषेत १९६७ साली आली, तेव्हा तो ३८ वर्षांचा होता. त्याची ती चेक भाषा बोलणारे फारतर दीडेक कोटी लोक जगात असतील.. म्हणजे कोंकणीपेक्षा निम्मे. पण 'द जोक' चेक भाषेत आल्यानंतर पुढल्याच वर्षी, म्हणजे कुंदेराने वयाची चाळिशी गाठण्याच्या आत फ्रेंच, इंग्लिश आणि जर्मन भाषेत या कादंबरीची भाषांतरे झाली. इंग्रजी वाचणाऱ्यांसाठी आज उपलब्ध आहे ती, 'द जोक'च्या पहिल्या चार इंग्रजी अनुवादित पुस्तकांना कुंदेराने नापसंत केल्यामुळे पाचव्यांदा अनुवाद करावा लागून मग आलेली प्रत! इतकी मिजास हा कुठल्याशा आडभाषेतला लेखक कसा काय दाखवू शकला, याचे उत्तर त्याच्या साहित्यातून शोधावे लागते. तीन काव्यसंग्रह, चार नाटके, ११ कादंबऱ्या आणि साहित्य तसेच राजकारणाबद्दलच्या निबंधांची चार पुस्तके हा त्याच्या साहित्याचा आकार सांगून काही उपयोग नाही.

**दिग्दर्शक ओम राऊतचा 'आदिपुरुष' हा सिनेमा नव्या पिढीला रामायण नव्याने सांगू पाहतोय. या सिनेमाची घोषणा झाली तेव्हा कित्येकांनी या निर्णयाचं स्वागत करत ओव्या गायल्या होत्या. पण जसजसे सिनेमाचे प्रोमो रिलीज झाले, तसतशी ओव्यांची जागा शिव्यांनी घेतलीय. नव्या पिढीला हे रिलीजआधीच प्रचंड ट्रोल झालेलं रामायण कितपत आपलंसं वाटेल, हे बघणं औत्सुक्याचं ठरणार आहे.**

# नव्या पिढीचं नवं रामायण

भारतीय सिनेसृष्टीतल्या महत्त्वाच्या दिग्दर्शकांपैकी एक असलेल्या श्रीशैलम राजामौलीचा 'बाहुबली' प्रदर्शित झाला, त्याला येत्या महिन्यात सात वर्षं पूर्ण होतील. 'बाहुबली'ने लोकल तेलुगू सिनेसृष्टीला ग्लोबल ओळख मिळवून दिलीच, त्याचबरोबर भारतीय सिनेमाचं संपूर्ण चित्रच बदलून टाकलं. बिग बजेट सिनेमांबद्दल बोलायचं झालं तर 'बाहुबली'च्या आधीचा आणि नंतरचा सिनेमा या दृष्टिकोनातून भारतीय सिनेजगताकडे बघायला हवं.

सिनेमातल्या स्पेशल इफेक्ट आणि वीएफएक्सची क्रेझ आणि त्याबद्दलचं गांभीर्य 'बाहुबली'ने खऱ्या अर्थाने वाढवलं. मोठं बजेट असेल तर आपली कथा अधिक भव्यदिव्यतेने मांडता येऊ शकते आणि त्यातून पैसाही कमावता येऊ शकतो हा आत्मविश्वास 'बाहुबली'ने आणखीनच दृढ केला. त्यानंतर 'बाहुबली'शी स्पर्धा करू पाहणाऱ्या सिनेमांची जंत्रीच लागली. 'आदिपुरुष' हा नवा सिनेमाही




त्यांच्यापैकीच एक! 'बाहुबली'ने बॉक्स ऑफिसवर आपलं वर्चस्व जमवताना यशाचे आणि व्यावसायिक फिल्ममेकींगचे नवे मापदंड प्रस्थापित केले. त्याआधी 'कोई मिल गया' आणि रजनीकांतच्या 'यंत्रन्' म्हणजेच हिंदीत डब झालेल्या 'रोबोट'सारखे एखाददुसरे सन्माननीय अपवाद वगळता अगदीच कार्टूनसदृश वीएफएक्स भारतीय सिनेमांमधून दाखवले जात होते. त्याच वीएफएक्सच्या मदतीने आपण काय कमाल करू शकतो, हे राजामौलीने या सिनेमातून दाखवून दिलं.

दुसरी गोष्ट म्हणजे भव्यदिव्यतेचा हव्यास. वीएफएक्सचा योग्य वापर करून खऱ्याखुऱ्या, खर्चिक सेटऐवजी स्वस्तात संगणकीकृत सेट उभारणं सोपं असल्याचं चित्र 'बाहुबली'ने रंगवलं. त्या जोरावर आपली गोष्ट आणखी भव्यदिव्यतेने मांडता येऊ शकते, असं अनेकांना वाटलं आणि त्यांनी तसा प्रयत्नही केला.

पण मोठमोठ्या निर्मितीसंस्था, अवाढव्य बजेट आणि आगळीवेगळी कथानकं असूनही 'बाहुबली'ची भव्यता गाठणं त्यांना जमलं नाही. भारतीय पुराणकथा, ऐतिहासिक कथांना पडद्यावर साकारणं हे तसं जिकिरीचं काम. स्थापत्यशास्त्राचा अद्भुत नमुना असलेली प्राचीन नगरं, त्यातल्या वैशिष्ट्यपूर्ण वास्तू, अफाट सेना, लढाईची रणधुमाळी असा तो वैभवशाली काळ पडद्यावर उभा करण्याचं शिवधनुष्य 'बाहुबली'च्या वीएफएक्स टीमने लीलया पेललं. त्यामुळे वीएफएक्स च्या जोरावर पौराणिक, ऐतिहासिक महानाट्यांना रुपेरी पडद्यावर आणण्याची एक चढाओढच सिनेजगतात सुरू झाली.

## ।। अभंगवाणी ।।



सुंदर तें ध्यान उभे विटेवरी ।  
कर कटावरी ठेवूनियां ॥१॥

तुळसीचे हार गळां कासे पीतांबर ।  
आवडे निरंतर तें चि रूप ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सर्वांना निधी मिळेल!

## » पुन्हा तक्रार येणार नाही याची खबरदारी घेईल : अजित पवार

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महाविकास आघाडीतच राहिलो असतो तर अजित पवारांनी शिवसेना संपवली असती. निधीवाटपात अजित पवारांकडून भेदभाव केला जात होता. शिवसेनेच्या आमदारांना निधीच दिला जात नव्हता, असे आरोप करतच शिंदे गट शिवसेनेतून बाहेर पडला. मात्र, तेच अजित पवार आज शिंदे सरकारमध्ये अर्थमंत्री झाल्याने शिंदे गटाच्या आरोपांचे काय झाले? असा प्रश्न विचारला जात आहे.**



या सर्व आरोपांवर आज उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार यांनीच भाष्य करत शिंदे गटाला विश्वासात घेण्याचा प्रयत्न केला. शिंदे गटाने केलेल्या आरोपांची एकप्रकारे कबुलीच देत अजित पवार म्हणाले की, जो काम करतो तोच चुकतो. जो काम करत नाही तो बिनचूक राहणारच ना. मला तर पहाटे 5 वाजेपासून काम करण्याची सवय आहे. शिंदे गटाच्या आमदारांच्या माझ्याबाबत ज्या काही तक्रारी असेल त्याकडे मी लक्ष देईल. त्या तक्रारीत थोडेही सत्य असेल तर कोणतेही आढेवेढे न घेता मी चूक कबुल करेल. पुन्हा याबाबत त्यांची तक्रार येणार नाही, याची खबरदारी घेईल. अजित पवार म्हणाले, शिंदे गट व आम्ही आता सोबत आहोत. त्यामुळे आमच्यामध्ये कटुता राहणार नाही. याची खबरदारी आम्ही घेऊ.

### पवार गटाला नऊ मंत्रिपदं

» भारतीय जनता पक्षासोबत असलेल्या समविचारी पक्षांची बैठक दिल्लीत होणार आहे. या बैठकीला मी आणि प्रफुल्ल पटेल उपस्थित राहणार असल्याची माहिती अर्थमंत्री अजित पवार यांनी दिली. या बैठकीदरम्यान आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्याचा प्रयत्न करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.

आपण सर्वजण आता जनतेसाठीच काम करत आहोत. जनतेच्या कल्याणासाठी, विकासासाठीच आपल्याला काम करायचे आहे. त्यामुळे भेदभाव करण्याचे कारणच नाही. अजित पवार म्हणाले, कोणत्याही आमदाराला विकासासाठी निधी कमी पडू देणार नाही. लवकरच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शिंदे गटाच्या आमदारांची व आमची बैठक होणार आहे. तेव्हा त्या सर्वांना विश्वासात घेतले जाईल. त्यांची जी काही नाराजी असेल ती दूर केली जाईल. अजित पवारांच्या नाशिक जिल्हा दौऱ्यात जोरदार शक्तिप्रदर्शन करत त्यांनी शरद पवारांना मोठा धक्का दिला. या वेळी आयोजित पत्रकार परिषदेमध्ये त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कामाचे कौतुक केले.

---

# राज्यात पुढील 5 दिवस जोरधार

## » विदर्भात यलो अलर्ट; कोकणात पावसाचा जोर

। मुंबई ।

प्रतिनिधी। महाईन्यूज

**राज्यात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान खात्याने व्यक्त केला. संपूर्ण विदर्भासाठी पुढील पाच दिवस यलो अलर्ट जारी करण्यात आला असून सर्वच जिल्ह्यांत पावसाची रिपरिप बघायला मिळणार आहे. सोबतच, कोकणात देखील पावसाचा जोर वाढणार असून शेतकऱ्यांची चिंता मिटण्याची आशा पल्लवित झाल्या आहेत. या अंदाजामुळे शेतकरी काहीसा सुखावणार आहे.**



### सर्वसामान्यांना दिलासा मिळणार

» राज्यात पुढील 15 दिवस पावसाळी असल्याचा अंदाज हवामान अभ्यासकांकडून वर्तवण्यात येत आहे. 18 जुलैपासून मुंबई आणि उपनगरात देखील पावसाचा जोर वाढण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यात देखील येत्या दिवसात पावसाचा जोर वाढेल अशी अपेक्षा आहे. त्यामुळे पाऊस न झाल्याने निर्माण झालेली तूट भरुन निघणार क? आणि शेतकऱ्यांसोबतच सर्वसामान्यांना दिलासा मिळणार का? हे बघणं महत्त्वाचे असेल.

संपूर्ण राज्यात पुढील पाच दिवस जोरदार पावसाचा इशारा. विदर्भात पुढील पाच दिवसासाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. मराठवाड्यात देखील पुढील दोन दिवस काही ठिकाणी जोरदार पावसाचा इशारा. 17 जुलैपासून पुन्हा तळ कोकणात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता. पुढील पाच दिवस जरी पावसाचा अंदाज असला तरी मागील दीड महिन्यात राज्यात पावसाने सरासरी देखील गाठलेली नाही. महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात पावसाची मोठी तूट बघायला मिळत आहे. हिंगोली आणि सांगलीत तर मोठी भीषण परिस्थिती आहे. 15 जुलैपर्यंत हिंगोलीत सरासरीच्या फक्त 24 टक्के तर सांगलीत फक्त 28 टक्के पाऊस झालाय. राज्यात 1 जून ते 15 जुलैपर्यंत 350 मिमीपैकी 276 मिमी. पाऊस झाला आहे. ज्यात संपूर्ण महाराष्ट्राचा विचार करायचा तर सध्या 21 टक्के तूट बघायला मिळत आहे. हिंगोलीत सरासरीच्या फक्त 24% तर सांगलीत सरासरीच्या 28% पाऊस झाला आहे.

# राज्यात नाही तर केंद्रात, मंत्रिपद द्या

। मुंबई ।

प्रतिनिधी। महाईन्यूज



राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अर्थमंत्री पद दिले तरी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यपध्दतीमुळे शिवसेनेच्या आमदारांवर अन्याय होणार नाही, असा विश्वास आमदार संतोष बांगर यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केला आहे. तर केंद्रात किंवा राज्यामध्ये हिंगोली जिल्ह्याला मंत्रीपद द्यावे, यासाठी आमचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. हिंगोली येथील शासकिय विश्रामगृहात खासदार हेमंत पाटील, आमदार संतोष बांगर यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी आमदार संतोष बांगर म्हणाले की, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कामामुळे प्रभावित होऊन शिवसेना-भाजपाला पाठींबा दिला आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात महाराष्ट्रातील शिवसेना-भाजप युती सरकारचा बोलबाला आहे. त्यामुळे अजित पवार युतीमध्ये सहभागी झाले आहेत. संतोष बांगर यांनी सांगितले की, आम्हाला मंत्रीपदाचा शब्द दिलेला आहे. त्याची पुर्तता होणारच आहे, असा विश्वास व्यक्त करत बांगर पुढे म्हणाले, केंद्रात किंवा राज्यामध्ये हिंगोली जिल्ह्याला मंत्रीपद द्यावे, यासाठी आमचे शिष्टमंडळ मुख्यमंत्री शिंदे यांची भेट घेणार आहेत.

# राहुल गांधी सर्वोच्च न्यायालयात

## मोदी आडनाव प्रकरण गुजरात हायकोर्टाने ठोठावली होती शिक्षा

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मोदी आडनाव प्रकरणी काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली आहे. त्यांनी आपल्या शिक्षेला स्थगिती देण्यासाठी याचिका दाखल केली आहे. याच प्रकरणात राहुल गांधी यांच्या दोन वर्षांच्या शिक्षेला स्थगिती देण्यास गुजरात उच्च न्यायालयाने 7 जुलै रोजी नकार दिला होता.उच्च न्यायालयाने म्हटले होते की, या प्रकरणाव्यतिरिक्त राहुल यांच्याविरुद्ध किमान 10 खटले प्रलंबित आहेत.**

अशा परिस्थितीत सुरत न्यायालयाच्या निर्णयात हस्तक्षेप करण्याची गरज नाही. गुजरात हायकोर्टाच्या निर्णयानंतर आम्ही आता सर्वोच्च न्यायालयात जाणार असल्याचे काँग्रेसने म्हटले होते.सुप्रीम कोर्टात राहुल यांच्या याचिकेवरील सुनावणीची तारीख अद्याप समोर आलेली नाही, मात्र सर्वोच्च न्यायालयाने दिलासा दिल्यास राहुल यांचे सदस्यत्व बहाल केले जाईल आणि ते 2024 ची लोकसभा निवडणूक लढवू शकतील. तसे झाले नाही तर त्यांना 8 वर्षे निवडणूक लढवता येणार नाही. दुसरीकडे, राहुल गांधींविरोधात बदनामीची तक्रार दाखल करणारे भाजप आमदार पूर्णेश मोदी यांनी 12 जुलै रोजी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले. मोदी आडनाव प्रकरणात राहुल यांची बाजू तसेच त्यांची बाजू ऐकून घेण्याची विनंती त्यांनी न्यायालयाला केली. सत्र न्यायालयाच्या निर्णयानंतर अवघ्या 27 मिनिटांत राहुल यांना जामीन मिळाला. 24 मार्च रोजी दुपारी 2.30 च्या सुमारास राहुल यांचे संसद सदस्यत्व रद्द करण्यात आले. केरळमधील वायनाड येथून ते लोकसभेचे सदस्य होते. लोकसभा सचिवालयाने एक पत्र जारी करून याबाबत माहिती दिली होती. लोकसभेच्या वेबसाईटवरूनही राहुल यांचे नाव हटवण्यात आले. खरे तर, सुप्रीम कोर्टाने 11 जुलै 2013 रोजी दिलेल्या निकालात म्हटले होते की, खालच्या कोर्टात दोषी ठरल्याच्या तारखेपासून कोणताही खासदार किंवा आमदार संसद किंवा विधानसभेच्या सदस्यत्वासाठी अपात्र ठरेल. लिली थॉमस विरुद्ध युनियन ऑफ इंडिया या खटल्यात न्यायालयाने हा आदेश दिला होता. यापूर्वी न्यायालयाचा अंतिम निर्णय येईपर्यंत आमदार किंवा खासदारांचे सदस्यत्व रद्द न करण्याची तरतूद होती. 2013 मध्ये सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला होता की जर खासदार/आमदाराला 2 वर्षे किंवा त्याहून अधिक शिक्षा झाली तर त्यांचे सदस्यत्व तात्काळ संपुष्टात येईल. मनमोहन सरकारने सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात अध्यादेश आणला होता, जेणेकरून सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय कुचकामी ठरेल. 24 सप्टेंबर 2013 रोजी काँग्रेस सरकारने अध्यादेशाच्या गुणवत्तेवर प्रकाश टाकण्यासाठी पत्रकार परिषद बोलावली. याच पत्रकार परिषदेत राहुल गांधी पोहोचले आणि म्हणाले - हा अध्यादेश मूर्खपणाचा आहे आणि तो फाडून फेकून द्यावा.



### त्यांची बाजूही ऐकून घेतली पाहिजे

राहुल गांधींविरोधात बदनामीची तक्रार दाखल करणारे भाजप आमदार पूर्णेश मोदी यांनी बुधवारी सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट दाखल केले आहे. मोदी आडनाव प्रकरणात राहुल यांच्यासोबत त्यांची बाजू ऐकून घेण्याची विनंती त्यांनी न्यायालयाला केली आहे. गुजरात उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात राहुल यांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्यास न्यायालयाने त्यांची बाजूही ऐकून घेतली पाहिजे, असे पूर्णेश यांचे म्हणणे आहे. कोणाचीही बाजू ऐकून घेतल्याशिवाय कोणताही आदेश काढू नये असे त्यांचे म्हणणे आहे

# रेडिओ कॉलरमुळे चित्त्यांचा मृत्यू!

## जीवाणूंमुळे झाला सेप्टिसीमिया ; तज्ज्ञांचा दावा

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेशच्या कुनो नॅशनल पार्कमध्ये आठवडाभरात दोन चित्यांच्या मृत्यूचे कारण म्हणजे त्यांच्या गळ्यातील रेडिओ कॉलरमुळे झालेला संसर्ग. रेडिओ कॉलरमुळे मानेभोवती ओलावा राहिला आणि बॅक्टेरिया वाढले. यामुळे चित्त्यांना सेप्टिसीमिया झाला ज्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. असे दक्षिण आफ्रिकेचे चित्ता मेटापोप्युलेशन विशेषज्ञ विन्सेंट वॅन डेर मेरवे यांचे म्हणणे आहे.**

### चार महिन्यांत आठ चित्ते मरण पावले

मध्य प्रदेशातील कुनो नॅशनल पार्कमध्ये गेल्या चार महिन्यांत आठ चित्त्यांचा मृत्यू झाला आहे. चित्ता सूरजच्या मृत्यूमागचे नेमके कारण शोधण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. यावर्षी 18 फेब्रुवारी रोजी दक्षिण आफ्रिकेतील आणखी 12 चित्ते कुनोमध्ये सोडण्यात आले. म्हणजे एकूण 20 चित्ते आणले होते.

मेरवे शनिवारी मंगोलियात होते. पीटीआय या वृत्तसंस्थेने मेरवेंशी संवाद साधला. दोन्ही नर चित्ते सेप्टिसिमियामुळे मरण पावल्याचे त्यांनी सांगितले. सेप्टिसिमिया हे एक गंभीर रक्त संक्रमण आहे. त्यामुळे रक्तात विष तयार होऊ लागते.

सुरक्षिततेसाठी आणि चित्त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी त्यांच्या गळ्यात रेडिओ कॉलर बसवण्यात आले आहेत. दक्षिण आफ्रिकेतून आणलेल्या सूरज या नर चित्त्याचा शुक्रवारी मृत्यू झाला, तर नर चित्ता तेजसचा मंगळवारी मृत्यू झाला. मेरवे म्हणाले की, रेडिओ कॉलर ओले असल्याने संसर्ग होत आहे. चित्त्याच्या मानेभोवतीच्या जखमा वीण किंवा दुसऱ्या प्राण्याशी भांडण करताना झालेल्या जखमा नव्हत्या. ते त्वचारोग आणि मायियासिस नंतर सेप्टिसीमियाचे प्रकरण होते. द चित्ता मेटापोप्युलेशन इनिशिएटिव्हच्या वतीने ते दक्षिण आफ्रिकेतील चित्ता मेटापोप्युलेशन प्रकल्पाचे व्यवस्थापन करतात असे मेरवे यांनी सांगितले. दक्षिण आफ्रिकेतून चित्ते भारतात आणण्यातही त्यांचा सहभाग होता. भारतातील प्रोजेक्ट चिताच्या भवितव्याबद्दल विचारले असता ते म्हणाले, भारतात पाठवलेल्या चित्त्यांपैकी 75 टक्के लोकसंख्या अजूनही जिवंत आणि निरोगी आहेत. मृत्यूची ही संख्या जंगली चित्यांच्या पुनर्प्रदर्शनासाठी सामान्य पॅरामीटर्समध्ये आहे. म्हणजेच, सध्या सर्वकाही ट्रॅकवर आहे.



# समान नागरीविषयी काँग्रेसची बैठक



।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**देशात समान नागरी संहितेबाबत काँग्रेस नेत्यांची आज बैठक होत आहे. बंद दाराआड होत असलेल्या या बैठकीत समान नागरी संहितेविषयी चर्चा होत आहे.या बैठकीत पी चिदंबरम, सलमान खुर्शीद, विवेक तन्खा, केटीएस तुलसी, लोकसभा खासदार मनीष तिवारी, एल हनुमंथय्या आणि अभिषेक मनु सिंघवी यांचा सहभाग असल्याचे अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या सूत्रांनी सांगितले.**

या प्रस्तावित कायद्याबाबत काँग्रेसने अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही.

काँग्रेसचे म्हणणे आहे की, आधी सरकार आपला मसुदा तयार करेल, त्यानंतरच काँग्रेस आपली भूमिका स्पष्ट करेल.

राज्यघटनेच्या कलम 44 अन्वये केंद्र सरकार संपूर्ण देशात समान नागरी संहिता लागू करण्याच्या तयारीत आहे. UCC अंतर्गत, विवाह, इच्छा, मूल दत्तक आणि इतर बाबींशी संबंधित प्रकरणांमध्ये देशभरात एकच कायदा लागू होईल.

# 40 वर्षाची कतरीना



कतरिना कैफ तिच्या 40 व्या वाढदिवसाच्या एक दिवस आधी पती विकी कौशलसोबत सुट्टीसाठी निघाली आहे. नुकतेच दोघेही मुंबई विमानतळावर स्पॉट झाले होते, ज्याचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर समोर आला आहे. या व्हिडिओमध्ये दोघेही एकमेकांचा हात धरताना दिसत आहेत. विमानतळावर कतरिना फ्लोरल टॉप आणि डेनिम जीन्समध्ये दिसली. पांढऱ्या शूज आणि काळ्या गॉगलसह तिने या लुकला पूर्ण केले.. त्याचवेळी विकी पांढऱ्या टी-शर्टसह काळ्या ट्रॅकसूटमध्ये दिसला. यादरम्यान दोघांनी पापाराझींना एकत्र पोजही दिली. व्हिडिओवर प्रतिक्रिया देताना एका चाहत्याने लिहिले की, 'कतरिना कैफ खूप सुंदर आहे.' आणखी एका युजरने लिहिले, 'बॉलिवुडमधील सर्वात सुंदर जोडप्यांपैकी एक'. तिसऱ्याने लिहिले, 'वाह दोघ छान दिसत आहेत'. कमेंट करताना आणखी एका यूजरने लिहिले की, 'एक नंबर जोडी लगती है इंकी'. कतरिना कैफ लवकरच ॲक्शन-थ्रिलर चित्रपट टायगर 3 मध्ये सलमान खानसोबत दिसणार आहे. याशिवाय तिच्याकडे विजय सेतुपतीसोबत श्रीराम राघवनचा मेरी ख्रिसमस हा चित्रपट आहे. चाहत्यांना तो फरहान अख्तरच्या 'जी ले जरा' या चित्रपटात आलिया भट्ट आणि

# पूजा भट्टचा चढला पारा

बिग बॉस ओटीटीचं दुसरं पर्व चांगलंच चर्चेत आहे. प्रत्येक आठवड्याला सदस्यांमध्ये कोणत्या ना कोणत्या कारणामुळे भांडणं पाहायला मिळतं आहेत. अलीकडेच घरात आशिका भाटिया व एल्विश यादव यांची वाइल्ड कार्ड एंट्री झाली आहे. एल्विशनं घरात येताच आपला खेळ दाखवण्यास सुरुवात केली आहे. त्यानं अविनाशला निशाणा बनवलं आहे. या दरम्यान पूजा भट्ट व जिया शंकरमध्ये कडाक्याचं भांडणं झालं आहे. पूजानं जियावर अनेक गंभीर आरोपही केले आहेत. बिग बॉसनं घरातील सदस्यांना एक टास्क दिला होता. ज्यानंतर पूजा भट्ट फलक नाजला समजवू लागली की, "तू जियापासून दूर राहा. प्रत्येक आठवड्याला जियाची मैत्री बदलते. पहिल्यांदा ती एखाद्या सदस्याशी चांगली मैत्री करते आणि नंतर त्यालाच नॉमिनेट करते. त्याच्याशीच भांडते, मग क्षणार्धात लहान मुलांसारखं वागवून त्या सदस्याला समजवते. जेव्हा तिला असं वाटतं ती कॉर्नर होतेय, तेव्हा ती रडायला सुरुवात करते.पूजा एवढ्यावरच थांबत नाही. ती बेडरुममध्ये जाऊन अविनाश, फलक आणि जदच्या समोर जियाची पोलखोल करते. जिया सर्व सदस्यांचा वापर करून घेत असल्याचा आरोप पूजा करते. ती म्हणते की, "जिया ही स्वतःनुसार प्रत्येक सदस्याचा वापर करते. त्यानंतर त्याच्या मागून वाईट गोष्टी बोलत असते. ती टॉक्सिक (विषारी) आहे. ती समोरच्या व्यक्तीला उसकवते, मग त्याच्यात राग निर्माण करते. त्यानंतर ती व्यक्ती वाईट असल्याचं सांगत फिरते. हे सर्व ऐकून जियाचाही पार चढतो. जेव्हा ती पूजाला गप्प बसवायला जाते, तेव्हा पूजा तिला 'शटअप' बोलते. त्यानंतर ती म्हणते की, "तू फलकबरोबर काय खेळतेस ते खेळ. तिला चांगली बाजू दाखवं. तू मला मूर्ख बनवू शकत नाही. अभिषेकबरोबर चांगली राहिलीस, त्यानंतर त्यालाच शिव्या घातल्या.

# तमन्नाचा डान्स



तमन्ना भाटिया अलीकडेच प्राइम व्हिडीओच्या 'जी करदा' या वेब सीरिजमध्ये दिसली होती. मालिकेच्या प्रीमियरला एक महिना उलटूनही या मालिकेला चाहत्यांकडून भरभरून प्रेम आणि दाद मिळत आहे. दरम्यान, या मालिकेच्या यशाचा आनंद साजरा करण्यासाठी अभिनेत्री मुंबईतील आर.डी. नॅशनल कॉलेजमध्ये पोहोचली होती. यादरम्यान सोशल मीडियावर एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामध्ये तमन्ना ढोल-ताशांवर नाचताना दिसत आहे. व्हिडिओमध्ये तमन्ना ग्रीन प्रिंटेड को-ऑर्डर सेटमध्ये दिसली होती. मॅचिंग जॅकेटसोबत मॅचिंग पॅन्टमध्ये ती स्टायलिश दिसली. यावेळी त्यांनी आपल्या महाविद्यालयीन दिवसांच्या आठवणी सांगितल्या आणि उपस्थित विद्यार्थ्यांशी संवादही साधला. या कार्यक्रमात अभिनेत्री म्हणाली- 'जी करदा'साठी आम्हाला मिळालेले प्रेम आणि कौतुक पाहून मी खूप आनंदी आणि उत्साहित आहे. लावण्याचे पात्र साकारणे खूप छान होते, मी माझ्या कॉलेजमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांसोबत हा क्षण साजरा करत आहे हे मला खूप आवडते. हा एक अद्भुत प्रवास आहे आणि या सुंदर अनुभवाचा भाग असलेल्या प्रत्येकाचे मनापासून आभार. या मालिकेचे दिग्दर्शन अरुणिमा शर्मा यांनी केले आहे. 'जी करदा'मध्ये तमन्ना भाटिया, आशिम गुलाटी, सुहेल नय्यर, अन्या सिंग, हुसैन दलाल, सायन बॅनर्जी आणि सामवेदना सुवाल्का यांच्या प्रमुख भूमिका आहेत.


# दिलदार भाईजान!

बॉलीवूडचा प्रसिद्ध अभिनेता सलमान खान हा त्याच्या चित्रपटांमुळे नेहमीच चर्चेत असतो मात्र त्याही पेक्षा जास्त तो त्याच्या उदारतेसाठी आणि लोकांना मदत करण्यासाठी ओळखला जातो. एकदाच नव्हे तर अनेक वेळा सलमान खान हा बऱ्याच बॉलिवूड कलाकारांच्या मदतीला धावून गेला आहे. त्यामुळेच त्याला भाईजानही म्हटलं जातं. तो सर्वांची मदत करण्यासाठी नेहमीच तयार असतो. याचाच प्रत्यय पुन्हा एकदा आला आहे. ब्रेन स्ट्रोकने त्रस्त असलेल्या राहुल रॉयची मदत भाईजानने केली आहे. राहुल रॉयच्या हॉस्पिटलचे बिल सलमान खानने भरल्याचा खुलासा खुद्द राहुल रॉय आणि त्याच्या बहिणीने केला आहे. 'आशिकी' या चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण करणारा राहुल रॉय याला 2020 मध्ये ब्रेन स्ट्रोक आला होता. त्यावेळी लडाखमध्ये त्याच्या 'LAC - लिव्ह द बॅटल' चित्रपटाच्या शूटिंग सुरु होतं. त्यावेळी राहुलला एअरलिफ्ट करावं लागलं आणि मुंबईतील नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले. राहूलनं सांगितलं की, या ब्रेन स्ट्रोक तो हॉस्पिटल बरेट दिवस होता आणि त्यावेळी हॉस्पिटलचे बिल सलमान खानने भरले होते. त्यांची बहीण प्रियांका रॉय आणि मेव्हणा रोमीर सेन त्याची काळजी घेत होते. नुकतच प्रियांका आणि राहुल यांनी खुलासा केला की, त्या चित्रपटाचे दिग्दर्शक नितीन गुप्ता यांनी सावधगिरी बाळगली असती आणि राहुलच्या प्रकृतीकडे दुर्लक्ष केलं नसतं तर हा ब्रेन स्ट्रोक टाळता आला असता.या अपघाताविषयी बोलतांना राहुल रॉयच्या बहिणीने सांगितले की, 'एलएसीच्या शूटिंगदरम्यान राहुल रॉय यांना ब्रेन स्ट्रोक आला होता, त्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल केलं.



# मीना कुमारीचा बायोपिक

फॅशन डिझायनर मनीष मल्होत्रा दिग्दर्शक म्हणून पदार्पण करणार आहे. मनीष मल्होत्रा प्रसिद्ध अभिनेत्री मीना कुमारीच्या बायोपिकमधून पदार्पण करणार आहे. या चित्रपटात मीना कुमारीची भूमिका कृती सेनन साकारणार आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार या चित्रपटाची निर्मिती भूषण कुमारची टी-सीरीज करणार आहे. सध्या हा चित्रपट स्क्रिप्टिंगच्या टप्प्यात आहे. मात्र, अद्याप या चित्रपटाबाबत कोणतीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.मीना कुमारी यांचे खरे नाव महजबीन बानो होते. तीन दशकांच्या कारकिर्दीत त्यांनी जवळपास ९० चित्रपटांमध्ये काम केले. मीना कुमारी यांनी बैजू बावरा, परिणीता, साहिब बीबी और गुलाम आणि काजल या



चित्रपटांसाठी सर्वोत्कृष्ट अभिनेत्री श्रेणीमध्ये 4 फिल्मफेअर पुरस्कार जिंकले. बालकलाकार म्हणून त्यांनी इंडस्ट्रीत पदार्पण केले. मीना कुमारी यांनी विनय भट्ट प्रॉडक्शन अंतर्गत लेदर फेस, अधुरी कहानी, पूजा या चित्रपटांमध्येही काम केले. मीना कुमारीला ट्रॅजेडी क्वीन म्हटले जाते. त्यांचे जीवन अडचणींनी भरलेले होते. त्यांच्या जन्मामुळे त्यांचे वडील इतके निराश झाले की त्यांनी त्यांना अनाथाश्रमात सोडले. वयाच्या 13 व्या वर्षी आईचे निधन झाले, चित्रपटाच्या सेटवरही शोषण झाले. वैवाहिक जीवनातही पतीच्या मारहाणीला कंटाळून मीना दारू प्यायच्या. मीना कुमारी सेटवर शूटिंग करताना रडण्यासाठी ग्लिसरीनचा वापर करत नसल्याचं म्हटलं जातं. अलीकडेच आदिपुरुष या चित्रपटात क्रिती सेनन सीतेच्या भूमिकेत दिसली होती. क्रिती लवकरच करीना कपूर खान आणि तब्बूसोबत 'द क्रू' या चित्रपटात दिसणार आहे.

# वेस्ट इंडिजचा सुपडासाफ!

## » टीम इंडियाचा एक डाव अन् 141 धावांनी दणदणीत विजय

**नवी दिल्ली ।**
**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजचा एक डाव आणि १४१ धावांनी पराभव केला. या विजयासह टीम इंडियाने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. त्याने पहिल्या डावात १५० धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने पहिल्या डावात ५ विकेट्स गमावत ४२९ धावा केल्या. टीम इंडियाला २७१ धावांची आघाडी मिळाली.**

वेस्ट इंडिजचा संघ दुसऱ्या डावात १३० धावांत गारद झाला. अशा प्रकारे टीम इंडियाने सामना जिंकला.

रविचंद्रन अश्विनने अप्रतिम गोलंदाजी करत वेस्ट इंडिजचा संघ १३० धावांत गुंडाळला. पहिल्या डावात पाच विकेट्स घेतल्यानंतर अश्विनने दुसऱ्या डावात तब्बल सात विकेट्स घेतले. या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. त्याने पहिल्या डावात १५० धावा केल्या. प्रत्युत्तरात भारताने पहिल्या डावात ५ विकेट्स गमावत ४२९ धावा केल्या.

टीम इंडियाला २७१ धावांची आघाडी मिळाली. वेस्ट इंडिजचा संघ दुसऱ्या डावात १३० धावांत गारद झाला. अशा प्रकारे टीम इंडियाने सामना जिंकला. रविचंद्रन अश्विनने अप्रतिम गोलंदाजी करत




वेस्ट इंडिजचा संघ १३० धावांत गुंडाळला. पहिल्या डावात पाच विकेट्स घेतल्यानंतर अश्विनने दुसऱ्या डावात तब्बल सात विकेट्स घेतले. या सामन्यात वेस्ट इंडिजने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. त्याने पहिल्या डावात १५० धावा केल्या.

प्रत्युत्तरात भारताने पहिल्या डावात ५ विकेट्स गमावत ४२९ धावा केल्या. टीम इंडियाला २७१ धावांची आघाडी मिळाली. वेस्ट इंडिजचा संघ दुसऱ्या डावात १३० धावांत गारद झाला. अशा प्रकारे टीम इंडियाने सामना जिंकला. दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजचा एकही फलंदाज क्रीझवर टिकू शकला नाही. त्याच्याकडून अलिक नाथनागेने सर्वाधिक २८ धावा केल्या.

### रोहित आणि यशस्वीने शतक ठोकले

तत्पूर्वी, यशस्वी जैस्वाल, कर्णधार रोहित शर्मा आणि माजी कर्णधार विराट कोहली यांनी भारतासाठी शानदार खेळी खेळली. यशस्वीने १७१ धावा केल्या. ही त्याची पदार्पणाची कसोटी होती. त्याचवेळी कर्णधार रोहितने १०४ धावांची खेळी केली. विराट कोहली शतकही करू शकला नाही आणि ७६ धावा करून बाद झाला. रवींद्र जडेजा नाबाद ३७ आणि इशान किशनने एक धाव काढली. शुबमन गिलने सहा आणि अजिंक्य रहाणेने तीन धावा केल्या. वेस्ट इंडिजकडून केमार रोच, अल्झारी जोसेफ, रहकीम कॉर्नवॉल, जोमेल वॅरिकन आणि ॲलिक अथानेज यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली.

जेसन होल्डरने नाबाद २० धावा केल्या. जोमेल वॅरिकन १८, अल्झारी जोसेफने १३ आणि जोशुआ डी सिल्वाने १३ धावा केल्या. रॅमन रेफरने ११ धावा केल्या. क्रेग ब्रॅथवेट आणि तागे नारायण चंदरपॉल प्रत्येकी ७ धावा करून बाद झाले. जर्मेन ब्लॅकवूडला ५ आणि रहकीम कॉर्नवॉलला केवळ ४ धावा करता आल्या. केमार रोचला खातेही उघडता आले नाही. भारताकडून अश्विनशिवाय रवींद्र जडेजाने दोन विकेट्स घेत मोलाची साथ दिली. मोहम्मद सिराजला पहिला ब्रेकथ्रू मिळाला.

# जोकोव्हिच अंतिम फेरीत

## » 35व्यांदा गाठली अंतिम फेरी

**। विम्बल्डन ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**सर्बियाच्या दुसऱ्या मानांकित नोव्हाक जोकोव्हिचने अप्रतिम कामगिरी सुरू राखताना विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. त्याने ग्रँडस्लॅम स्पर्धेची तब्बल ३५व्यांदा अंतिम फेरी गाठली असून अशी कामगिरी करणारा तो पहिला पुरुष टेनिसपटू ठरला आहे.**

शुक्रवारी झालेल्या पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात २३ ग्रँडस्लॅम विजेत्या जोकोव्हिचने आठव्या मानांकित इटलीच्या यानेक सिन्नेरला ६-३, ६-४, ७-६ (७-४) असे सरळ सेटमध्ये पराभूत केले. सामन्यातील पहिला व दुसरा सेट जोकोव्हिचने सहज जिंकला.

तिसऱ्या सेटमध्ये मात्र सिन्नेरने जोकोव्हिचला आव्हान दिले. हा सेट टायब्रेकरवर गेला. परंतु, जोकोव्हिचने खेळ उंचावत विजय साकारला आणि आठव्यांदा विम्बल्डनचे जेतेपद मिळवण्याकडे कूच केली.जोकोव्हिचने यावर्षी झालेल्या ऑस्ट्रेलियन आणि फ्रेंच खुल्या स्पर्धेचे जेतेपद मिळवले आहे. या स्पर्धेत जेतेपद पटकावल्यास त्याचे हे हंगामातील सलग तिसरे जेतेपद ठरेल. जाबेऊर-वोंड्रोसोव्हामध्ये जेतेपदासाठी द्वंद्व आज विम्बल्डन ट्युनिशियाची सहावी मानांकित ओन्स जाबेऊर आणि चेक प्रजासत्ताकची मार्केटा वोंड्रोसोव्हा यांच्यात विम्बल्डन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचा अंतिम सामना शनिवारी रंगणार आहे. दोन्ही टेनिसपटूंचा पहिले ग्रँडस्लॅम जेतेपदाचे लक्ष्य आहे. जाबेऊरने आपल्या गेल्या सहा सामन्यांत चार ग्रँडस्लॅम विजेत्या खेळाडूंना नमवले आहे.




# इंडिया डब्ल्यूटीसीमध्ये अव्वल



**। पुणे ।**
**महाईन्यूज । वृत्तसंस्था ।**

**डॉमिनिका येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात भारतीय संघाने वेस्ट इंडिजचा धुव्वा उडवला. भारताने एक डाव आणि १४१ धावांच्या मोठ्या फरकाने विजय मिळवला. या विजयासह भारताने मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. दुसरीकडे, जागतिक कसोटी चॅम्पियनशिप अंतर्गत खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारताचे १२ गुण झाले आहेत. यामुळे तो गुणतालिकेत अव्वल स्थानी पोहोचला आहे.**

यापूर्वी ऑस्ट्रेलियाचा संघ या स्थानावर होता.

खरेतर, जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या तिसऱ्या आवृत्तीत आतापर्यंत एकूण चार संघ आहेत ज्यांनी किमान एक सामना खेळला आहे. भारताशिवाय या यादीत ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि वेस्ट इंडिजचा समावेश आहे.

यामध्ये या सामन्यापूर्वी ऑस्ट्रेलिया अव्वल स्थानावर होता. ज्याने इंग्लंडविरुद्ध पहिले दोन कसोटी सामने जिंकले होते, मात्र शेवटच्या सामन्यात पराभव पत्करावा लागला.

या प्रकरणात, गुणांच्या बाबतीत, ऑस्ट्रेलियाचे २२ गुण आहेत आणि भारताचे केवळ १२ गुण आहेत. पण एकही सामना न गमावल्यामुळे भारताच्या गुणांची टक्केवारी १०० आहे.ऑस्ट्रेलियाला हेडिंग्ले कसोटीतील पराभवाचा फटका बसला आहे.

तीन सामन्यांनंतर त्यांच्या गुणांची टक्केवारी ६१.११ आहे. त्याच वेळी, इंग्लंड या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहे, ज्याची विजयानंतर गुणांची टक्केवारी २७.७८ आहे. स्लो ओव्हर रेटमुळे ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडने ॲशेसमध्ये प्रत्येकी दोन गुण गमावले, ज्यामुळे त्यांच्या गुणांच्या टक्केवारीवरही परिणाम झाला.